# राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग
## महाराष्ट्र शासन

जा.क्र.रागांवितंआ/फा.२०११/प्र.क्र.३/२११
अपीजय हाऊस, 3 रा मजला,
दिनशॉ वाच्छा रोड, के.सी. कॉलेज जवळ,
चर्चगेट मुंबई-४०० ०२०.
दूरध्वनी क्र. -०२२ - ४००६१७९३
ई-मेल - rgstcmaha@reddiffmail.com
दिनांक: -०९एप्रिल,२०२६

## निविदा सूचना

राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग, महाराष्ट्र शासन यांच्या अधिनस्त असलेली **टोयोटा इनोव्हा (Toyota Innova)** या जुन्या वाहनाच्या विक्रीकरिता / लिलावासाठी "जशी आहे तशा स्थितीत" मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

२. सदर निविदा सदस्य सचिव (प्रभारी), राजीव गांधी विज्ञान आयोग, अपीजय हाऊस, 3 रा मजला,दिनशॉ वाच्छा रोड, के.सी. कॉलेज जवळ, चर्चगेट मुंबई-४०० ०२० या पत्त्यावर, शुक्रवार दिनांक १०/४/२०२६ रोजी ते मंगळवार दिनांक २१/४/२०२६ रोजीपर्यंत सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत पोहोचतील अशा पध्दतीने मोहोरबंद पाकिटात पाठवाव्यात. विहित वेळेत, कालावधीत प्राप्त निविदा बुधवार दि. २२/४/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता उघडण्यात येतील. निविदा उघडतेवेळी निविदाधारकास उपस्थित राहण्यास परवानगी आहे.

३. कोणतेही कारण न देता निविदा स्विकारण्याचे वा नाकारण्याचे अधिकार आयोगाने राखून ठेवले आहेत, याची कृपया नोंद घ्यावी.

Vrushali. M. K

**(डॉ.वृषाली कुलकर्णी)**
**सदस्य सचिव प्रभारी**
राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग

# राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग
# महाराष्ट्र शासन

जा.क्र.रागांवितंआ/फा.२०११/प्र.क्र.३/२११
अपीजय हाऊस, 3 रा मजला,
दिनशॉं वाच्छा रोड, के.सी. कॉलेज जवळ,
चर्चगेट,मुंबई-४०० ०२०.
दूरध्वनी क्र. -०२२ - ४००६१७९३
ई-मेल - rgstcmaha@reddiffmail.com
दिनांक: -०९ एप्रिल,२०२६

## निविदा सूचना

राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे जुने **टोयोटा इनोव्हा (Toyota Innova)** हे वाहन लिलावाद्वारे विक्रीकरून निर्लेखित करण्याकरिता "जशी आहे तशा स्थितीत" देकारासाठी मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

- **उपलब्ध वाहनाचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-**

| अ.क्र. | वाहनाचा तपशील | माहिती |
|---|---|---|
| १ | **वाहन क्रमांक** | **एम.एच.01 - ए.एन. - 0199 (MH01 AN 0199)** |
| २ | **वाहनाचा प्रकार** | टोयोटा इनोव्हा (Toyota Innova) 2.5G **(Seven seater) सिल्व्हर कलर (डिझेल)** |
| ३ | **इंजिन नंबर** | **2KD6970033** |
| ४ | **चेसीस नंबर** | **MBJ11JV4007315449** |
| ५ | **वाहनाचा नोंदणी दिनांक** | 17 मार्च 2012 **(MFG.-02/2012)** |
| ६ | **वाहनाची स्थिती** | जशी आहे तशा स्थितीत (चालू स्थितीत) |
| ७ | **वाहनाची निश्चित केलेली किंमत (Base Price)** | **रु. २,२५,०००/- (अक्षरी रु.दोन लाख पंचवीस हजार मात्र)** |
| ८ | **वाहन तपासणी** | **सचिवालय जिमखाना, जनरल जे.बी.भोसले मार्ग, मंत्रालयासमोर,मुंबई-४०० ०३२ येथे दुपारी १२.०० ते सायंकाळी ४.३० वाजेपर्यंत** |

- **निविदे संदर्भात नियम व अटी:**

१. **निविदा सादरीकरण:** इच्छुक निविदाधारकांनी आपले दर नमूद करुन मोहोरबंद लिफाफ्यात निविदा " सदस्य सचिव (प्रभारी), राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग, मुंबई" यांच्या कार्यालयात शुक्रवार, दिनांक १०/४/२०२६ रोजी ते मंगळवार दिनांक २१/४/२०२६ रोजीपर्यंत सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (फक्त कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सुट्टीचे दिवस वगळून) सादर कराव्यात. लिफाफ्यावर "वाहन क्र. एम.एच.01 ए.एन. 0199 (टोयोटा इनोव्हा) या वाहनाच्या विक्रीसाठी निविदा" असा स्पष्ट उल्लेख असावा.

२. **बयाणा / इसारा रक्कम (EMD):** निविदेसोबत रु. २,०००/- ( दोन हजार रुपये मात्र) इतकी बयाणा/ इसारा रक्कम (परत करण्यात येणारी) राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्षाच्या (Demand Draft)/ धनादेश स्वरुपात "RAJIV GANDHI SCIENCE & TECHNOLOGY COMM." यांच्या नावे काढण्यात यावा. विहित प्रक्रियेअंती यशस्वी निविदाधारक वगळता उर्वरित निविदा धारकांना त्यांच्या उर्वरित बयाणा/ इसारा रक्कमेचे

धनाकर्ष /धनादेश निविदा प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर परत करण्यात येतील. यशस्वी निविदा धारकाची बयाणा/इसारा रक्कम मूळ किंमतीतून समायोजित करण्यात येईल.

३. आयोगाने निर्लेखनाकरिता निश्चित केलेल्या रकमेपेक्षा कमी रकमेची बोली स्विकारली जाणार नाही. असल्यास, ती नामंजूर केली जाईल व त्याकरिता भरणा केलेली इसारा रक्कम परत केली जाणार नाही.

४. **निविदा उघडणे:** विहित कालावधीत व वेळेत प्राप्त निविदा बुधवार दिनांक २२/४/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता कार्यालयात उघडण्यात येतील. निविदा उघडतेवेळी निविदाधारक किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधीस उपस्थित राहण्यास परवानगी आहे.

५. **वाहनाचा ताबा:** यशस्वी निविदाधारकास निविदा मंजूर झाल्याचे कळल्यापासून रोख रक्कम भरून एका आठवड्याच्या आत वाहनाचा प्रत्यक्ष ताबा घेणे आवश्यक आहे. सदर वाहन "आहे त्या स्थितीत व आहे त्या ठिकाणाहून स्वखर्चाने" ताब्यात घ्यावे लागेल.

६. **हस्तांतरण व कर:** वाहनाच्या हस्तांतरण नोंदणीची प्रक्रिया (RTO Transfer) आणि नियमानुसार लागू असलेले कर भरण्याची संपूर्ण जबाबदारी व खर्च यशस्वी निविदाधारकाचा राहील.

७. **कागदपत्रे:** निविदेसोबत निविदाधारकाने स्वतःच्या ओळखीचा पुरावा (पॅनकार्ड / आधारकार्ड / मतदार ओळखपत्र) तसेच कंपनी /फर्मच्या नावे वाहन खरेदी करावयाचे असल्यास त्याचे वस्तू व सेवा कर अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र, रुपये २०००/- चा धनाकर्ष / धनादेश सादर करणे आवश्यक राहील.

८. **दरपत्रके पाठविण्याकरिता व उघडण्यावेळी हजर (ऐच्छिक) राहवयाचा पत्ता** – राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग, अपीजय हाऊस, ३ रा मजला, दिनशॉ वाच्छा रोड, के.सी. कॉलेज जवळ, चर्चगेट, मुंबई-४०० ०२०.

९. यशस्वी निविदाधारक नियम व अटी नुसार करार पूर्ण करू शकत नसल्याचे दिसून आल्यास त्यांनी भरलेल्या इसाऱ्याची रक्कम जप्त करण्यात येईल.

१०. आयोगाला सादर करावयाच्या निविदेच्या कागदपत्रात रकमेच्या आकडेवारीत व अक्षरी रकमेत विसंगती नसावी व इतरत्र कुठेही खाडाखोड, Over Writing,पांढरी शाई लावणे इत्यादी टाळावे. अशा निविदा प्राप्त झाल्यास सरळ रद्द करण्यात येतील आणि त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

११. **अधिकार:** कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्वीकारण्याचे किंवा सर्व निविदा फेटाळण्याचे/रद्द करण्याचे अंतिम अधिकार आयोगाने राखून ठेवले आहेत.

१२. **वेळापत्रक :-**

- दरपत्रके सादर करण्याचा कालावधी शुक्रवार दिनांक १०/४/२०२६ ते मंगळवार दिनांक २१/४/२०२६
- दरपत्रके सादर करण्याची वेळ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (फक्त कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व सुट्टीचे दिवस वगळून)
- दरपत्रके उघडण्याचा दिनांक बुधवार, २२/४/२०२६ वेळ दुपारी ३.०० वाजता.

Vaishali M.K

**(डॉ.वृषाली कुलकर्णी)**
**प्रभारी सदस्य सचिव**
राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग

**प्रति,**
**सदस्य सचिव (प्रभारी)**
राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग,
अपीजय हाऊस, ३ रा मजला,
दिनशॉ वाच्छा रोड, के.सी. कॉलेज जवळ,
चर्चगेट,मुंबई-४०० ०२०.

**विषय :- वाहन क्र. एम.एच.01 ए.एन. 0199 (टोयोटा इनोव्हा) या वाहनाच्या विक्रीसाठी निविदा.**

**निविदा दर पत्रक (Tender Form)**
(निविदाकाराने लिफाफ्यामध्ये भरून देण्याकरिता)

१. **निविदाकाराचे नाव:** ____________________

२. **संपूर्ण पत्ता:** ____________________

३.**संपर्क क्रमांक (मोबाईल क्र.):** ____________________

४. **ओळखपत्र (पॅन कार्ड / आधार कार्ड क्रमांक):** ____________________

५. **बयाणा रक्कम (EMD) तपशील (DD क्र. व दिनांक):** ____________________

६. **वाहन क्र. एम.एच.०१ ए.एन. ०१९९ (टोयोटा इनोव्हा) करिता निविदाकाराने नमूद केलेली खरेदी किंमत:**

- **अंकामध्ये:** रु. ______________/-
- **अक्षरी:** ____________________ रुपये मात्र.

मी निविदेमधील सर्व नियम व अटी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत.

**ठिकाण:**

**दिनांक:**

**(निविदाकाराची स्वाक्षरी व नाव)**

**टिप :- कंपनीच्यावतीने निविदा सादर केल्यास कंपनीचा संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक देण्यात यावा.**